नाशिक जिल्हा परिषद, नाशिक
आरोग्य विभाग
दुरध्वनी:-०२५३-२५०८५१२
ई-मेल-dhonashik@gmail.com

जा. क्र. : आरोग्य/MGASG/ १४९ /२०२६. दिनांक:०६/१०/२०२६.

# अभिव्यक्ती व्याज सूचना (Expression of Interest - EOI Notice)
## अभिव्यक्ती व्याज (EOI) नोटीस बोर्ड प्रसिद्धी पत्र

**विषय:** 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत जिल्हास्तरीय स्वयंसेवी संस्थांकडून (NGOs) अभिव्यक्ती व्याज (EOI) मागविण्याबाबतची जाहिरात / सूचना मसुदा.

**संदर्भ** : १. शास निर्णय क्र.:आंगायो-2025/प्र.क्र.24/ई-फिसक्र.1245954/प्रा.आ.से., दि. 18/02/2026.
२. मा. आयुक्त (शहरी आरोग्य) आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, आयुक्तालय, मुंबई यांचे पत्र जा. क्र.: आयुक्त/आसे/मागाआसंगा अभियान/जिल्हास्तर NGO-EOI/१४२५-१५०४/२०२६. दि: २२/०९/२०२६.
३. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. नाशिक यांची प्रशासकीय मान्यता आदेश जा. क्र. आरोग्य /MGASG/१४८/२०२६. दि. ०५/१०/२०२६.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागात **'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव'** हे अभियान लोकसहभागातून (जनभागीदारी) राबविण्यासाठी पात्र व अनुभवी स्वयंसेवी संस्थांकडून (NGOs) **अभिव्यक्ती व्याज प्रस्ताव (Expression of Interest - EOI)** मागविण्यात येत आहेत.

1. **प्रस्तावाचा उद्देश (Objective) :** ग्रामीण भागात संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे निर्मूलन, माता-बाल व प्रजनन आरोग्य, मानसिक आरोग्य आणि स्वच्छता याविषयी लोकसहभागातून (IEC & BCC माध्यम) प्रभावी जनजागृती करणे आणि स्थानिक आरोग्य समित्यांना सक्रिय करणे.

2. **EOI/प्रस्तावामध्ये सादर करावयाची आवश्यक माहिती व कागदपत्रे:** संस्थेने आपल्या EOI प्रस्तावासोबत खालील मुद्द्यांनुसार माहिती व आवश्यक पुरावे जोडणे अनिवार्य आहे:

- **संस्थेची प्राथमिक माहिती:** संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता, संस्था नोंदणी क्रमांक व नोंदणी दिनांक (संस्था नोंदणी अधिनियम, 1860 / मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 अंतर्गत वैध प्रमाणपत्र जोडणे), नीति आयोग (NITI Aayog - NGO Darpan) नोंदणी ID व प्रमाणपत्र.
- **अधिकृत संपर्क व्यक्तीचा तपशील :** अधिकृत प्रतिनिधीचे नाव व पदनाम, मोबाईल क्रमांक, व्हॉट्सॲप क्रमांक व अधिकृत ई-मेल आयडी.
- **आरोग्य क्षेत्रातील अनुभव :** केलेल्या कामाचा किमान 3 वर्षांचा अनुभव तपशील व कामाचे स्वरूप.
- **ग्रामीण व गावपातळीवरील कामाचा अनुभव :** नाशिक जिल्हा ग्रामीण भागात आरोग्य क्षेत्रातील / सामाजिक क्षेत्रातील गावपातळीवर लोकसहभागातून राबविलेल्या प्रकल्पांचा अनुभव.
- **IEC/BCC, जनजागृती व लोकसहभागाचा अनुभव :** पथनाट्य, लोककला, प्रभातफेरी, भित्तीचित्रे (Wall Paintings), ग्रामसभा व बचत गट बैठकांद्वारे जनजागृती केल्याचा प्रत्यक्ष अनुभव.
- **उपलब्ध प्रशिक्षित मनुष्यबळाची माहिती :** संस्थेकडे उपलब्ध असलेले फील्ड कॉर्डीनेटर्स, प्रशिक्षक व विषय तज्ज्ञ मनुष्यबळाची यादी व त्यांची शैक्षणिक पात्रता.

- **मागील प्रकल्पांची माहिती व कामाचे पुरावे :** गेल्या 3 वर्षांत पूर्ण केलेल्या प्रकल्पांची यादी, कामाचे वाटप पत्र (Work Orders), प्रकल्प समाप्ती प्रमाणपत्रे (Completion Certificates) व कामाची प्रकाशचित्रे (Photographs), गेल्या 3 वर्षांचे ऑडिटेड स्टेटमेंट व IT Return.
- **Monitoring & Reporting (नियंत्रण व अहवाल) क्षमता :** मासिक प्रगती अहवाल (Monthly Progress Report), फोटो/व्हिडिओ पुरावे, बैठकांचे इतिवृत्त आणि डिजिटल पद्धतीने अहवाल सादर करण्याची संस्थेची तांत्रिक क्षमता व नियोजन.

3. **निवडलेल्या NGO ची प्रत्यक्ष कामे व अंमलबजावणी पद्धती:**
   - **कामाचे स्वरूप:** गावातील आरोग्य गरजांचे आकलन करणे, ग्रामस्थांचा सहभाग वाढवणे, Gram Health, Sanitation & Nutrition Committee (VHNSC) व जन आरोग्य समित्यांशी समन्वय ठेवणे, महिला/बालके/वंचित घटकांचा सहभाग निश्चित करणे, तसेच मानसिक व संसर्गजन्य/असंसर्गजन्य आजारांबाबत जनजागृती करणे.
   - **Bottom-up पद्धती:** *गावातील समस्या → ग्रामस्थांचा सहभाग → स्थानिक उपाययोजना → आरोग्य विभागाचे सहकार्य.* केवळ Top-down सूचनांऐवजी प्रत्यक्ष स्थानिक गरजा व समुदायाला केंद्रस्थानी ठेवून जनजागृती उपक्रम राबविणे.

4. **प्रस्ताव सादरीकरणाची पद्धत व वेळापत्रक:**

| क्र. | टप्पा / बाबी | निश्चित केलेली तारीख / वेळ |
|---|---|---|
| 1 | EOI नोटीस बोर्ड प्रसिद्धी दिनांक | 06 **ऑक्टोबर** 2026 |
| 2 | प्रस्ताव (EOI) सादर करण्याचा अंतिम दिनांक | 13 **ऑक्टोबर** 2026 (**सायंकाळी** 5:00 **वाजेपर्यंत**) |
| 3 | प्रस्तावांची तांत्रिक छाननी (Technical Scrutiny) | 15 **ऑक्टोबर** 2026 |
| 4 | पात्र संस्थांचे सादरीकरण (Presentation) | 21 **ऑक्टोबर** 2026 |

5. **देयके व मूल्यमापन अटी :** संस्थांना कामाच्या प्रगतीचा भौतिक व आर्थिक अहवाल (Physical & Financial Progress Report) सादर केल्यानंतर मान्य दराप्रमाणे टप्प्याटप्प्याने (Phase-wise) देयके अदा केली जातील, सर्व खरेदी, छपाई व प्रसिद्धी साहित्य (IEC Material) शासनाच्या प्रचलित नियमावलीनुसार असणे अनिवार्य आहे.

6. **नियम व अटी:**

1. संस्था कोणत्याही शासकीय यंत्रणेकडून काळ्या यादीत (Blacklisted) नसलेले रु. 100/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र (Affidavit) जोडणे अनिवार्य आहे.
2. विहित मुदतीनंतर (13/10/2026 सायंकाळी 5:00 वाजेनंतर) प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.
3. प्राप्त प्रस्ताव स्वीकारणे अथवा नाकारण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**प्रस्ताव सादर करण्याचा पत्ता:**
सीलबंद लिफाफ्यावर स्पष्ट लिहावे: "**'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत EOI प्रस्ताव**"
**कार्यालयीन पत्ता:** जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, नाशिक.

जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक.

**प्रत माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर :**

१. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक.
२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक.
३. मा. उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक.
४. मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत), जिल्हा परिषद, नाशिक.